**<u>शपथेवर खरे सांगतो की,</u>**

**साक्षीदाराचे नाव - जितेंद्र मारूती इंगळे**
**वय - ३७ वर्षे,**
**हुद्दा - अप्पर तहसिलदार, पनवेल,**
**राहणार - खारघर, नवी मुंबई**

**<u>सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:-</u>**

जिल्हाधिकारी यांच्या अधिकारपत्रानुसार मी आज साक्ष देण्यासाठी आलो आहे. मी अधिकारपत्र दाखल केले आहे. मी सन २०१५ पासुन सेवेत आहे. महसुल संबंधातील कागदपत्रे जिल्हाधिकारी यांच्याकडे असतात व त्याबाबत मला माहिती आहे. मला कागदपत्रे आणण्यासंदर्भात साक्षीसमन्स आले होते. त्याप्रमाणे मी कागदपत्रांची कार्यालयीन प्रत आणलेली आहे. पत्र दिनांक २८/०१/२००९ रोजी रायगड जिल्हयातील उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, रायगड यांना देण्यात आलेले आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकुर व पत्र पाठविलेल्यामधील मजकुर बरोबर आहे. कार्यालयीन रेकॉर्डप्रमाणे मजकुर खरा व बरोबर आहे. (वादींचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू पत्रास निशाणी क्रमांक देण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.९ यांचे वि. अधिवक्ता यांनी निशाणी क्रमांक देण्यास हरकत नसल्याचे प्रतिपादन केले. इतर प्रतिवादी गैरहजर. साक्षीदाराने कार्यालयीन रेकॉर्डप्रमाणे मजकुर खरा व बरोबर असल्याचे व त्यावर जिल्हाधिकारी यांची सही असल्याचे नमुद केले असुन न्यायाच्या हिताच्या दृष्टीने पत्रास निशाणी क्रमांक देण्यात येते.) सदर पत्रास **<u>निशाणी क्र.१५५</u>** देण्यात येते. रायगड जिल्हयातील गावकीच्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर सर्व गावातील व्यक्तींची नावे लिहीता येत नसुन

प्रातनिधिक स्वरूपात पंचांची नावे लावली जातात. अशा पंचांना जमीन विक्री करणे, गहाण देणे, भाडेपट्टयाने देणे वा वापरात बदल करण्याचा कुठलाही अधिकार नसतो. हे पत्र संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दिले जाते.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे :-</u>**

**<u>वि. अधिवक्ता यांनी उलटतपास घेणार नसल्याचे प्रतिपादन केले.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिवादी क्र.१९ यांचेतर्फे घेण्यात येणारा उलटतपास स्वीकृत असल्याचे प्रतिपादन केले.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१९ तर्फे ॲड. एस. के. राणे:-</u>**

२. मी दाखल केलेले पत्र संपुर्ण जिल्हयाला लागु आहे. मी केवळ जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील पत्राच्या अनुषंगाने साक्ष देण्यासाठी आलो आहे. निशाणी क्र.१५५ वरील पत्र सन २००९ चे आहे. हे पत्र तहसिलदार कार्यालयात आलेले आहे. दिनांक २८/०१/२००९ च्या पत्राच्या अनुषंगाने पुढील पत्रव्यवहार आमच्या तहसिलदार कार्यालयात आलेला आहे काय हे मला आता सांगता येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेले पत्र हे परिपत्रक म्हणता येणार नाही. निशाणी क्र.१५५ वर पत्र असुन तो आदेश नाही. पत्राच्या अनुषंगाने व्हॅल्युएबल प्रॉपर्टीज असोसिएट्स यांनी अपील दाखल केल्याची मला कल्पना नाही. दिनांक १६/०१/२०१० चे पत्र जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी तहसिलदार, पनवेल यांना दिले होते. दिनांक १६/०१/२०१० रोजी पाठविलेल्या पत्राची सत्यप्रत मी दाखल करू

शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदरहू दाव्यातील मिळकतीबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या पुढील झालेल्या घडामोडींबाबत मला प्रत्यक्षात माहिती नाही. दिनांक २८/०१/२००९ रोजीचे पत्र आज रोजी अस्तित्वात आहे की नाही हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि.अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.२० तर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.४१ ते ४८ तर्फे**
**उलटतपास घेणार नसल्याचे प्रतिपादन केले.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

पनवेल
दिनांक : २०/०२/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल